**ठळक बातम्या**

- नौवहन क्षेत्रामुळे देशाच्या विकासाला चालना मिळत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात, आगामी निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरले जाणार नसल्याचं राज्य निवडणूक आयोगाकडून स्पष्ट

- छत्तीसगडमधे बिजापूर जिल्ह्यात ५९ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० क्रिकेट मालिकेतला पहिला सामना पावसामुळे रद्द

**<><><><><>**

नौवहन क्षेत्रामुळे देशाच्या विकासाला चालना मिळत असून भारताच्या नौवहन सामर्थ्यावर जगाचा विश्वास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातल्या प्रतिनिधींच्या परिषदेला ते आज संबोधित करत होते. मागच्या दशकभरात नौवहन क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन झालं असून व्यापार आणि बंदरे पायाभूत सुविधांना चालना मिळाली असं प्रधानमंत्री म्हणाले. सरकारनं नौवहन क्षेत्रात सुधारणांसाठी महत्त्वाची पावलं उचलली आहेत, शतकभर जुने कायदे बदलून २१ व्या शतकातले आधुनिक कायदे लागू केले आहेत. यामुळे स्टेट मेरिटाईम बोर्डाची क्षमता वृद्धिंगत झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मोदी**

डिजीटायजेशनचा विस्तार करण्यात आला आहे, मर्चंट शिपींग ऍक्टमधे बदल करण्यात आला आहे, सरकारचा हस्तक्षेप कमी झाला आहे, असंही त्यांनी

सांगितलं. सरकार नौवहन क्षेत्राला प्राधान्य देत असून या क्षेत्रात गुंतवणूक करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल उपस्थित होते.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे महाराष्ट्रात, आगामी निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरले जाणार नाहीत असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. काही अपवाद वगळता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतल्या जातात. त्यासाठी व्हीव्हीपॅट जोडणीची सुविधा असलेली मतदान यंत्रं विकसित करण्याबाबत देशातील सर्व राज्य निवडणुक आयोगांची टेक्निकल इव्हॅल्यूशन कमिटी अभ्यास करत आहे, तिचा अहवाल अद्याप न आल्यानं व्हीव्हीपॅटचा वापर शक्य नाही असं आयोगानं म्हटलं आहे.

या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी मतदार याद्यांमधल्या संभाव्य दुबार नावांची तपासणी करून योग्य ती दक्षता घेण्याचे, तसंच दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश सर्व संबंधितांना राज्य निवडणूक आयोगानं आज दिले.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचारानं वेग घेतला आहे. आज छठ उत्सवाच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांचे वरिष्ठ नेते आणि स्टार प्रचारकांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज बिहारच्या मुझ्झफरपूर जिल्ह्यात साक्रा इथून प्रचाराला सुरुवात केली. सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी भाजपावर टीकास्त्र सोडलं. महाआघाडी सत्तेवर आली तर बिहारमध्ये

उद्योग उभारणीला प्रोत्साहन दिलं जाईल आणि राज्यातल्या युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><><>

औद्योगिक उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राला मोठी संधी असून देश याबाबतीत जगाचं नेतृत्व करेल, तेव्हा महाराष्ट्र देशात आघाडीवर असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं.

कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर या तीन क्षेत्रांतल्या प्रगतीचा मोठा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर पडला असून याचा फायदा कसा करून घेता येईल, याचा विचार नीती आयोगाच्या रोडमॅपमध्ये केला असल्याचं फडनवीस म्हणाले. अत्याधुनिक कारखानदारी क्षेत्रातली जगातली पहिली प्रशिक्षण संस्था महाराष्ट्रात उभारण्याचा नीती आयोगाचा मानस असल्याची माहिती त्यांनी कार्यक्रमानंतर वार्ताहरांशी बोलताना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, तसंच नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम उपस्थित होते .

<><><><><>

डॉ संपदा मुंडे आत्महत्याप्रकरणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संपदा मुंडे यांच्या कुटुंबाशी आज दूरध्वनीवरून संवाद साधला. डॉक्टर संपदा यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण मुंडे कुटुंबाच्या सोबत आहोत, असं आश्वासन गांधी यांनी यावेळी दिलं, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

<><><><><>

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त देशासह राज्यात सर्वत्र सरदार @१५० एकता अभियानांतर्गत विविध उपक्रम आयोजित केले आहेत. सर्व नागरिकांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन

करण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर आणि ७ नोव्हेंबर रोजी भव्य पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येनं भाग घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे बिजापूर जिल्ह्यात आज ५९ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यात ९ महिलांचा समावेश आहे. हे माओवादी गेली अनेक वर्ष बस्तर विभागातल्या विविध भागांमधे सक्रीय होते. त्यांच्यावर एकूण ६६ लाख रुपयांचं बक्षीस सरकारनं जाहीर केलं होतं. छत्तीसगड सरकारच्या पूना मर्घुएम या पुनवर्सन योजनेअंतर्गत या सर्वांनी बिजापूर जिल्हा पोलीस मुख्यालयात शरणागती पत्करली.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला. ऑस्ट्रेलियात कॅनबेरा इथं झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताच्या ५ षटकात १ बाद ४३ धावा झाल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला. पुन्हा खेळ सुरु झाल्यानंतरही पाऊस आल्यानं भारताची धावसंख्या १ बाद ९७ असताना सामना रद्द करण्यात आला.

**<><><><><>**

जर्मनीत सुरू असलेल्या हायलो खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेन, किरण जॉर्ज आणि उन्नती हुड्डा यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत लक्ष्य सेनने फ्रान्सच्या क्रिस्तो पोपोव याला २१-१६, २२-२० असं पराभूत केलं. तर किरण जॉर्ज याने भारताच्याच किदंबी श्रीकांत याला २१-१९, २१-११ असं पराभूत केलं. महिला एकेरीत उन्नती हुड्डाने ब्राझीलच्या जुलिएना विएरा हिच्यावर २१-४, २१-१३ अशी मात दिली.

**<><><><><>**

देशानं स्वतःच तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर द्यायला हवा असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे.नवी दिल्लीत आज झालेल्या टायइकॉन  परिषदेला ते संबोधित करत होते. महत्वाच्या क्षेत्रासाठीच्या तंत्रज्ञानासाठी काही देशांवर गरजेपेक्षा जास्त अवलंबून राहणं कमी करायला हवं असं ते म्हणाले.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं मोंथा चक्रीवादळ काल आंध्रप्रदेशच्या किनाऱ्यावर धडकलं. मात्र आता त्याचा जोर कमी झाला असून ते वायव्येच्या दिशेने पुढे सरकत आहे असं हवामान विभागानं सांगितलं. मात्र वादळाच्या प्रभावामुळे मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. यामुळे नदी, नाले, ओढ्यांना पूर आला असून विविध प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

अरबी समुद्रावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेले काही तास मुंबईपासून ४१० किलोमीटर अंतरावर स्थिर राहिला असून तो येत्या ३६ तासात ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे.

ओदिशामधे मोंथा चक्रीवादळाचा फटका ३३ प्रभागांना बसला आहे. मदत छावण्यांमधे आश्रय घेतलेल्या १८ हजाराहून अधिक जणांना अन्नपुरवठा करण्यासाठी राज्य सरकारने ३६२ सामूहिक स्वयपाकघरं उभारली आहेत.

**<><><><><>**

गुंतवणूकदारांच्या सोयीसाठी म्युच्युअल फंडाच्या  शुल्क आकारणीची पूर्ण फेररचना करण्याचा प्रस्ताव सेबीनं ठेवला आहे. मुंबईत आज प्रसिद्ध केलेल्या सुधारणा मसुद्यात सेबीने म्हटलंय की, सुधारित रचनेत नियम सुटसुटीत केले असून त्यामुळे भागधारकांचा  खर्च कमी होईल.  म्युच्युअल फंड खर्च गुणोत्तरातून रोखे

हस्तांतरण कर, वस्तू आणि सेवा कर, मुद्रांक शुल्क अशी विविध शुल्क वगळली आहेत. तसंच निधी व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यां लावत असलेला ५ बेसिस पॉईंट्सचा खर्च काढून टाकावा असंही सेबीनं सुचवलं आहे. दलाली आणि हस्तांतरण शुल्कावर कठोर निर्बंध घालण्याचाही प्रस्ताव मसुद्यात आहे.

**<><><><><>**

गावाचा कारभार चालवण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढाकार घ्यावा आणि त्यांचा सहभाग वाढावा या हेतूनं आदर्श युवा ग्राम सभेचं प्रारूप येत्या ३० तारखेला नवी दिल्लीत सादर होणार आहे. पंचायती राज मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयानं एकत्र येऊन हा पुढाकार घेतला आहे.

**<><><><><>**

इ-विधान या विषयावरची तिसरी राष्ट्रीय परिषद उद्या नवी दिल्लीत होत आहे. संसदीय कामकाज मंत्रालयानं या परिषदेचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

ओबीसींनी आता स्वतःचं आरक्षण वाचवण्यासाठी पुढं यावं, आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यासाठी निर्णायक भूमिका घ्यावी, असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. आज नांदेड इथं ओबीसींच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, त्यानंतर झालेल्या सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

चेन्नई इथं २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या पुरुष आणि महिला दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

**//<><><><><>//**